

कोल्हापूर : प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांचा सत्कार करताना खेडूत शिक्षण मंडळाचे पी. सी. पाटील व प्राचार्य डॉ. एस. पी. बांदिवडेकर.

# नूतन प्र-कुलगुरुंचा खेडूत शिक्षण मंडळाकडून सत्कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु पदी डॉ. पी. एस. पाटील यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा खेडूत शिक्षण मंडळातर्फे सत्कार करण्यात आला. संस्थेचे हितचिंतक माजी विद्यार्थी प्रा. पी. सी. पाटील, माजी प्राचार्य डॉ. एस. पी. बांदिवडेकर यांनी प्र-कुलगुरु डॉ. पाटील यांची शिवाजी विद्यापीठ येथे भेट घेवून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# विद्यापीठात वनौषधी लागवड

## लीड बोटॅनिकल गार्डनमध्ये वनस्पतीशास्त्र विभागाचा उपक्रम

टेंबलाईवाडी, ता. १३ : शिवाजी विद्यापीठाच्या लीड बोटॅनिकल गार्डनमध्ये विविध प्रकारच्या वनौषधींची लागवड करण्यात आली. यामुळे पश्चिम घाटातील अनेक वनौषधींचे संवर्धन झाले. नागरिकांनाही एकाच ठिकाणी या सर्व वनस्पती पाहता येतात. विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाने या वनस्पतींची लागवड केली आहे.

जिल्ह्यात जैवविविधता विपूल प्रमाणात आढळते. सहा डोंगराळ तालुक्यांमध्ये वनक्षेत्राचे प्रमाण अधिक आहे. या शिवाय राधानगरी अभयारण्यातही अतीदाट वनक्षेत्र आहे. या सर्व ठिकाणी वैविध्यपूर्ण जैवविविधता आढळते. यामध्ये विविध प्रकारच्या वनस्पती आढळतात. प्राचिन काळापासून असणाऱ्या पण आता दुर्मिळ होत चाललेल्या वनस्पतीही येथे आहेत. यामध्ये वनौषधींचे प्रमाणही अधिक आहे. या वनौषधींचा उपयोग करून बऱ्याच रोगांवरील औषधे बनवली जातात. काही वनौषधी नामशेष होण्याच्या मार्गावर असून, त्यांचे उल्लेख केवळ आयुर्वेद आणि त्यासारख्या ग्रंथांतच आढळतात. काही वनस्पती केवळ घनदाट वनक्षेत्रातच आढळतात. त्यांचीही लागवड केली आहे. जिल्हा नियोजन समितीच्या प्रकल्पांतर्गत लीड बॉटनिकल गार्डनमध्ये या वनस्पतींची लागवड करता आली. येथे बऱ्याच शाळांच्या सहली येतात. विद्यार्थ्यांना औषधी वनस्पती पाहण्याची संधी मिळते. या वनस्पतींचे औषधी उपयोग आणि त्यांची वैशिष्ट्ये त्यांना सांगितली जातात. औषधी वनस्पतींचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांनाही वनौषधींचा अभ्यास करता येतो. या सर्वच दृष्टिकोनातून लीड बॉटनिकल गार्डनमधील वनौषधींची लागवड उपयुक्त ठरते.




लीड बॉटनिकल गार्डन

### गार्डनमधील वनौषधी

बेल, सितेचा अशोक, सप्तरंगी, वावडींग, नरक्या, सुरंगी, नागकेसर या वनस्पतींसह अन्य औषधीवनस्पतीही गार्डनमध्ये लावण्यात आल्या आहेत.

**जिल्ह्यातील जैवविविधतेच्या विपुल खजिन्यामध्ये मोठ्या प्रमाणात वनौषधी आहेत. त्या विद्यार्थ्यांना पाहता याव्यात, संशोधकांना अभ्यासता याव्यात यासाठी त्यांची लागवड केली आहे. भविष्यातही लीड बॉटनिकल गार्डनमधील या वनौषधी अभ्यासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या ठरतील.**

**- डॉ. एन. बी. गायकवाड,** सदस्य, व्यवस्थापन परिषद, शिवाजी विद्यापीठ